
NAAC Accredited-2022
'B' Grade (CGPA 2.92)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स: ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: fao.@sus.ac.in



## खरेदी व भांडार विभाग

जा.क्र. पुअहोसोविसो/विवले/खभांवि/२०२३/ 855 दिनांक: - 3 APR 2023

**On University Website**

**प्रति,**

**--------------------**

**विषय: प्रस्तुत विद्यापीठाकरिता एक खाजगी बस/ट्रॅव्हलर (२० सीटर) भाडेतत्वावर दि.१३/०४/२०२३ ते दि.१७/०४/२०२३ या कालावधीत उपलब्ध करुन मिळण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत...**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, **प्रस्तुत विद्यापीठातील जैवविज्ञान संकुलातील सुक्ष्मजीवशास्त्र भाग २ च्या विद्यार्थ्यांची (एकूण विद्यार्थी संख्या-१६, सहा. प्राध्यापक-४ असे एकूण २०) शैक्षणिक सहल शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था, गोवा येथे (अंदाजे १००० कि.मी. च्या वर) दि.१३/०४/२०२३ ते दि.१७/०४/२०२३ या कालावधीत नियोजित आहे. त्याकरिता सुस्थितीत असणारे (२० सीटर) एक खाजगी बस/ट्रॅव्हलर भाडेतत्वावर पुरवठा करण्यासाठी** दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी आपले अपेक्षित दर GST सह सोबत जोडलेल्या ***अंदाजपत्रकामधील [SCHEDULE – B]*** तपशीलाप्रमाणे दर दरपत्रकात भरुन मा.वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या नावे सिलबंद लिफाफ्यात पाठवावे. दरपत्रकासंदर्भात सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे. वरील कामाचे दरपत्रक व सुचना पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठाच्या ***http://su.digitaluniversity.ac*** या संकेतस्थळावर (***Quotation***) या शिर्षकाखाली उपलब्ध आहे.

| अ.क्रं | तपशिल | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | दरपत्रके प्रकाशित करण्याचा दिनांक व वेळ | ०३/०४/२०२२ | | वित्त व लेखा विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग, केगांव, सोलापूर- ४१३ २५५ |
| २. | दरपत्रके स्विकारण्याची दिनांक व वेळ | ०३/०४/२०२२ | | |
| ३. | दरपत्रक सादर करणे अंतिम दिनांक व वेळ | ११/०४/२०२२ | दु. ०३.०० | |
| ४. | दरपत्रक उघडण्याचा दिनांक/वेळ आणि ठिकाण (शक्य झाल्यास) | ११/०४/२०२२ | दु. ०३.३० | |

(सीए. श्रेणिक शाह)
**वित्त व लेखा अधिकारी**

## सुचना व अटी

१. कंपनी/फर्मचे शॉप ॲक्ट, पॅन कार्ड GST Registration ग्राहक सुची, दरपत्रकातील सुचना व अटी स्वाक्षरीत करुन इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. तसेच सोबत जोडलेल्या SCHEDULE-B मध्ये नमुद केल्याप्रमाणे सादर करावेत. GST (%) सह दर नमूद करावा.

२. वाहन पुरवठा करावयाच्या वाहनाचा विमा (Full Insurance) असणे आवश्यक आहे. याबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी पुरवठादार यांच्यावर राहील. पुरवठा करण्यात येणाऱ्या वाहनांची वैध नोंदणी, वाहनाचा विमा, पीयुसी असणे आवश्यक आहे. या संदर्भात RTO कडून काही दंड झाल्यास याबाबत विद्यापीठाची जबाबदारी राहणार नाही.

३. पुरवठा केलेले वाहन/वाहने वापर केलेल्या व्यक्तीकडून वाहन वापर अहवालावर स्वाक्षरी घ्यावी. तसेच त्याच्या कि.मी. ची नोंद स्वतंत्रपणे ठेवून वाहन स्वाक्षरीत वापर अहवाल व कि.मी. नोंदवही देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील. प्रत्यक्षात वाहनांचा वापर झाल्याप्रमाणेच देयके आदा करण्यात येईल.

४. **Toll & Parking च्या देयकांच्या व त्याचे स्टेटमेंट पावत्याप्रमाणे रक्कम आदा करण्यात येतील. या व्यतिरीक्त इतर कोणतेही चार्जेस आदा करण्यात येणार नाहीत.**

५. आपण पुरवठा करणाऱ्या वाहनाचा चालक अनुभवी, उच्च प्रशिक्षित, परवानाधारक, निर्व्यसनी, सुशिक्षित, नम्र असणे बंधकारक आहे.

६. **दरपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक सहलीची ठिकाणे दोन (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था, गोवा) नमूद केलेली आहेत.**

७. **पाकीटावरती शैक्षणिक सहलीकरिता एक खाजगी बस/ट्रॅव्हलर भाडेतत्वावर (दि.१३/०४/२०२३ ते १७/०४/२०२३ या कालावधीकरिता) उपलब्ध करुन मिळण्यासाठी दरपत्रक असा स्पष्ट उल्लेख करावा.**

८. दरपत्रके देताना आपले दर सर्व करासहित (Including GST) असा स्पष्ट उल्लेख करावा. तसेच ज्या पुरवठादाराची वार्षिक उलाढाल जास्त नसेल त्यांनी GST लागू नसल्याचे फर्मच्या लेटर हेडवर लेखी स्वरुपात द्यावे लागेल. तसेच सदर वाहने परीक्षा विभागाच्या आवश्यकतेनुसार व मागणीनुसार विद्यापीठात पाठविण्यात यावीत.

९. देयकामधुन आवश्यक करांची कपात करून देयक आदा करण्यात येईल.

१०. **सादर केलेल्या दरपत्रकाच्या दरामध्ये खाडाखोड किंवा व्हाईटनरचा वापर केला गेला असल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.**

११. सादर केलेल्या दरपत्रकामध्ये दरपत्रकधारकांनी अटी व शर्ती नमूद करुन दर दिले असल्यास दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

१२. दरपत्रकासोबत असलेले सुचना व अटींचे काटेकोरपणे पालन करणे बंधकारक राहील.

१३. कोणतेही कारण न देता दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणे किंवा कोणत्याही टप्प्यावर प्रक्रिया रद्द करण्याबाबत विद्यापीठाने अधिकार राखून ठेवलेले आहेत. तसेच पुरवठा आदेशानुसार वाहने उपलब्ध न झाल्यास पुरवठादाराचा ठेका रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

१४. वरील दरपत्रकासंदर्भात काही शंका/अडचण असल्यास विद्यापीठाच्या ०२१७-२७४४७७०-७४ (Ext.१७३) (मो.नं. ९९२२७६६५६७) या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

१५. दरपत्रक हे सिलबंद पाकिटातून कार्यालयीन वेळेत मा. वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग केगांव, सोलापूर-४१३ २५५ यांच्या नावाने विहित मुदतीत पोहोचतील अशा बेताने पाठवावीत. दिलेल्या मुदतीनंतर म्हणजेच उशिरा आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. तसेच अटी व शर्ती असलेली दरपत्रके मंजूर करण्यात येणार नाहीत.

१६. यशस्वी पुरवठाधारकासोबत कायदेशीर कलह निर्माण झाल्यास सोलापूर येथील न्यायकक्षेच्या अखत्यारित राहील.

१७. **वरील सुचना व अटी मान्य असून ते माझ्यावर बंधनकारक राहतील.**

**पुरवठादाराची स्वाक्षरी व शिक्का**

**प्रति,** **दि.**

मा. वित्त व लेखा अधिकारी
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर.

**विषय: प्रस्तुत विद्यापीठाकरिता एक खाजगी बस/ट्रॅव्हलर (२० सीटर) भाडेतत्वावर दि.१३/०४/२०२३ ते दि.१७/०४/२०२३ या कालावधीत उपलब्ध करुन मिळण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत...**

**महोदय,**

वरील विषयांकित वाहने आम्ही खालील नमूद दराप्रमाणे पुरवठा करण्यास तयार आहोत.

***अंदाजपत्रक [SCHEDULE – B]***

***{दरपत्रक हे फर्मच्या लेटर हेडवर द्यावे}***

| अ.क्र. | वाहनाचा तपशील | प्रती कि.मी. (डिझेलसह) | | |
|---|---|---|---|---|
| | | बस/ट्रॅव्हलर | | |
| | | दर | जीएसटी | एकूण दर |
| १. | खाजगी बस/ट्रॅव्हलर सोलापूर ते शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था, गोवा (जाणे व येणे दि.१३/०४/२०२३ ते १७/०४/२०२३ या कलावधीकरिता) | | | |

उपरोक्त दराप्रमाणे मी/आम्ही काम करण्यास तयार आहोत.

पुरवठादाराची स्वाक्षरी व शिक्का